6. Figures for the previous periods have been regrouped, wherever necessary, to confirm the current period's classification.

*By the order of Board of*
**ROSSELL TECHSYS LIMITED**
**Krishnappayya Desai**
Company Secretary
A61281

Place : Bengaluru
Date : August 13, 2025

## Precot Limited

**(CIN: L17111TZ1962PLC001183)**

SF No.559/4, D-Block, 4th Floor, Hanudev Info Park, Nava India Road, Udaiyampalayam, Coimbatore - 641 028.
Tel: 0422 - 4321100 E-mail: secretary@precot.com Website: www.precot.com

**STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE 2025**

₹ in Lakhs

| Sl. No. | Particulars | Quarter Ended 30-Jun-25 | Corresponding 3 months ended in the previous year 30-06-2024 (Restated) | Year Ended 31-Mar-25 | Quarter Ended 30-Jun-25 | Corresponding 3 months ended in the previous year 30-06-2024 (Restated) | Year Ended 31-Mar-25 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Unaudited | | Audited | Unaudited | | Audited |
| | | Standalone | | | Consolidated | | |
| 1. | Total income from continuing operations | 20,761.46 | 20,994.09 | 87,250.88 | 20,761.46 | 20,994.09 | 87,250.88 |
| 2. | Net profit/(Loss) for the period from continuing operations (before exceptional items and tax) | 1,491.16 | 1,504.85 | 6,791.27 | 1,491.16 | 1,504.85 | 6,791.27 |
| 3. | Net profit/(Loss) for the period from continuing operations before tax (after exceptional items) | 1,491.16 | 1,504.85 | 6,791.27 | 1,491.16 | 1,504.85 | 6,791.27 |
| 4. | Net profit/(Loss) for the period from continuing operations after tax (after exceptional items) | 1,130.20 | 1,145.88 | 5,177.35 | 1,130.20 | 1,145.88 | 5,177.35 |
| 5. | Net profit/(Loss) for the period from discontinued operations (before exceptional items and tax) | - | (269.74) | (2,380.16) | - | (269.74) | (2,380.16) |
| 6. | Net profit/(Loss) for the period from discontinued operations after tax | - | (205.40) | (1,888.61) | - | (205.40) | (1,888.61) |
| 7. | Profit/(Loss) for the period (4 + 6) | 1,130.20 | 940.48 | 3,288.74 | 1,130.20 | 940.48 | 3,288.74 |
| 8. | Total Comprehensive income for the period (comprising profit / (loss) for the period (after tax) and other Comprehensive income (after tax) ) | 1,110.34 | 929.26 | 3,208.40 | 1,110.34 | 929.26 | 3,208.40 |
| 9. | Equity Share Capital | 1,200.00 | 1,200.00 | 1,200.00 | 1,200.00 | 1,200.00 | 1,200.00 |
| 10. | Other Equity | - | - | 41,309.67 | - | - | 43,649.67 |
| 11. | Earnings Per Share of ₹ 10/- each ( Basic & Diluted) | 9.42 | 7.84 | 27.41 | 9.42 | 7.84 | 27.41 |

The above is an extract of the detailed format of quarterly financial results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the financial results are available on the company's website (www.precot.com) and Stock Exchange website (www.nseindia.com). The same can be accessed by scanning QR code provided below.

By order of the board
**Ashwin Chandran**
Chairman & Managing Director
**(DIN : 00001884)**

Coimbatore
13.08.2025

# मुंबईतील आद्य उच्च न्यायालय

**मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना १४ ऑगस्ट १८६२ रोजी झाली. त्याआधी दक्षिण मुंबईत आताच्या लायन गेट परिसरातील ग्रेट वेस्टर्न इमारतीत हे न्यायालय होते. उच्च न्यायालयाला आज (१४ ऑगस्ट) १६३ वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचे औचित्य साधून सुप्रीम कोर्ट ऑफ बॉम्बे ते मुंबई उच्च न्यायालय या रंजक प्रवासाचा घेतलेला वेध...**

**मयूर फडके**




मुंबई उच्च न्यायालय म्हटले, की आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते भव्यदिव्य अशी ऐतिहासिक वास्तू. परंतु आज दिसणारी मुंबई उच्च न्यायालयाची इमारत ही मूळ वास्तू नाही. वाचून आश्चर्य वाटेल; पण मुंबईला पूर्वी सर्वोच्च न्यायालय होते. लायन गेट परिसरातील ग्रेट वेस्टर्न इमारतीत आधी उच्च न्यायालय होते. ग्रेट वेस्टर्न इमारतीचा इतिहास जाणून घ्यायचा असेल तर आपल्याला अठराव्या शतकात जावे लागेल. ही गोष्ट सुरू होते ती १७६४ पासून. ही इमारत १७६४पूर्वी तत्कालीन मुंबईचे माजी गव्हर्नर विल्यम हॉर्नबी यांच्या मालकीची होती. तथापि, १७६४ पासून १७९२ दरम्यान ब्रिटिश नौदलाचे ॲडमिरल या इमारतीत वास्तव्याला होते. या इमारतीला त्या काळात ॲडमिरल्टी हाऊस म्हणून ओळखले जाऊ लागले. १८००च्या सुमारास ते सरकारने विकत घेतले. १८०० मध्ये मुंबईचे फर्स्ट रेकॉर्डर न्यायालय याच इमारतीत सुरू करण्यात आले. फर्स्ट रेकॉर्डर या पदावरचा माणूस ईस्ट इंडिया कंपनीचा कर्मचारी म्हणून काम करत असे. तिथपासून ते नवे उच्च न्यायालय स्थापन होईपर्यंत या इमारतीला 'सुप्रीम कोर्ट ऑफ बॉम्बे' म्हणून ओळखले जाऊ लागले.

### सर्वोच्च न्यायालयाची स्थापना

ही इमारत विकत घेतल्यानंतर २६ वर्षांनी १८२६मध्ये त्यात तत्कालीन मुंबई इलाख्यासाठी सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. या सर्वोच्च न्यायालयात इंग्लंड किंवा आयर्लंडवरून बॅरिस्टरची पदवी आणि पाच वर्षांचा अनुभव असलेले एक मुख्य न्यायाधीश अन् दोन अतिरिक्त न्यायाधीश या पदावर नेमले जात. पुढे भारतात हळूहळू स्वातंत्र्याच्या ठिणग्या पेटायला सुरुवात झाली होती. त्याचे काही पडसाद या न्यायालयातही उमटायला लागले होते. त्यात भर पडली ती ब्रिटिश अधिकाऱ्यांमधल्या यादवीची. माजी फर्स्ट रेकॉर्डर असलेले सर एडवर्ड वेस्ट हे त्या वेळी 'सुप्रीम कोर्ट ऑफ बॉम्बे'मध्ये मुख्य न्यायाधीश म्हणून काम करीत होते. पदावर आल्यापासून ईस्ट इंडिया कंपनीच्या कार्यकारी वर्चस्वापासून न्यायालयाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ते बराच काळ प्रयत्न करीत होते. मुंबई इलाख्याचे तत्कालीन गव्हर्नर सर जॉन माल्कम यांनी सर्वोच्च न्यायालयाने काढलेल्या एका आदेशाच्या अंमलबजावणीला नकार दिला, तेव्हा या ठिणगीचा भडका उडाला. हे आदेश काढल्यानंतर काही काळाने सर एडवर्ड वेस्ट यांचे निधन झाले; पण त्यांच्या जागी दुसरे न्यायाधीश असलेल्या जॉन पीटर ग्रँट यांनी एक नवा आदेश काढला. तो आदेशही माल्कम यांनी पाळायला नकार दिला. त्यामुळे संतापलेल्या ग्रँट यांनी सर्वोच्च न्यायालय आणि त्याची कार्यालये बंद केली. नवीन मुख्य न्यायाधीश नियुक्त होईपर्यंत जवळपास पाच महिने न्यायालय बंद राहिले. विशेष म्हणजे ग्रँट यांनी घेतलेल्या भूमिकेचे मुंबईच्या नागरिकांनी कौतुक केले. त्यानंतर १८६१मध्ये ब्रिटिश संसदेने भारतीय उच्च न्यायालयांचे कायदे लागू करीत सर्वोच्च न्यायालय, दिवाणी तसेच फौजदारी न्यायालये रद्द केली. या सर्व न्यायालयांचे अधिकार क्षेत्र नव्याने स्थापन केलेल्या मुंबई उच्च न्यायालयाला देण्यात आले आणि अशा प्रकारे या इमारतीत मुंबई उच्च न्यायालय सुरू झाले. १४ ऑगस्ट १८६२ रोजी न्यायाधीशांचा शपथविधी झाला. सध्याच्या उच्च न्यायालयाच्या इमारतीचे बांधकाम १८७१मध्ये सुरू झाले. सात वर्षांनी बांधकाम पूर्ण झाल्यानंतर १८७९मध्ये या नव्या इमारतीत उच्च न्यायालय हलवण्यात आले.

उच्च न्यायालय स्थलांतरित झाल्यावर ही ग्रेट वेस्टर्न इमारत रुस्तमजी जीजीभॉय यांनी खरेदी केली आणि नंतर ससून कुटुंबाला विकली. या इमारतीचे ग्रेट वेस्टर्न हॉटेलमध्ये रूपांतर करण्यात आले. १८९०च्या दशकाच्या सुरुवातीला एक नवीन पाच मजली शाखा जोडण्यात आली. तिची रचना प्रसिद्ध वास्तुविशारद एस. एम. एन. चंदाभॉय यांनी केली होती, जी ब्रिटिश मान्यवर वापरत होते. या मालमत्तेचा वापर मोठ्या प्रमाणात सार्वजनिक निवासस्थाने आणि व्यावसायिक कार्यालयांसाठी केला गेला. आजही इथे अनेक कार्यालये आहेत.

### सर्वोच्च न्यायालयातील गाजलेला खटला

या न्यायालयाने अनेक खटल्यांमध्ये न्यायदान केले. 'सुप्रीम कोर्ट ऑफ बॉम्बे'मधील एका प्रसिद्ध खटल्यावर बेतलेला 'महाराज' हा चित्रपटही गाजला होता. मुंबईच्या सांस्कृतिक आणि पर्यायाने सामाजिक सुधारणेच्या मार्गावर हा खटला एक मैलाचा दगड ठरला होता.

## 'मतदारयाद्यांमध्ये बदल व्हायला हवे'

» पान १ वरून

२००३ मध्ये ७ पैकी एक कागदपत्र पुरावा म्हणून देण्यास सांगण्यात आले होते. 'एसआयआर' प्रक्रियेवर नजर टाकली तर ही प्रक्रिया मतदारांप्रती अनुकूल असल्याचे दिसून येते, असे निरीक्षण न्या. सूर्यकांत आणि न्या. जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठाने नोंदविले. आधारकार्ड स्वीकारले जात नसल्याची याचिकाकर्त्यांची तक्रार आहे. तथापि पुरावा म्हणून अन्य कागदपत्रे देण्याचा पर्याय मतदारांसमोर असल्याचे न्या. सूर्यकांत यांनी स्पष्ट केले. 'पुराव्यांसाठी जी कागदपत्रे मागण्यात आली आहेत, त्यांची संख्या निश्चितपणे जास्त आहे मात्र यातील बहुतांश कागदपत्रे लोकांकडे नाही,' असे ॲड. अभिषेक मनू सिंघवी यांनी सांगितले. सिंघवी यांनी यावर पासपोर्टचे उदाहरण दिले. 'बिहारमध्ये केवळ एक ते दोन टक्के लोकांकडे पासपोर्ट असावेत. राज्यात स्थायी निवासी प्रमाणपत्र देण्याची कोणतीही तरतूद नाही. बिहारमधील लोकांकडील कागदपत्रे पाहिली तर त्यांच्याकडे खूप कमी कागदपत्रे असल्याचे दिसते,'' असे ते म्हणाले.

### त्या लोकांची संख्या मोठी

"एसआयआर मोहिमेवर कोणाचाही आक्षेप नाही; मात्र निवडणूक ऐन तोंडावर असताना ही मोहीम का हाती घेतली जात आहे, हा प्रश्न असल्याचे सांगतानाच ज्या लोकांकडे जमीन नाही, ते लोक तीन प्रकारची कागदपत्रे पुरावा म्हणून देऊ शकत नाहीत. अशा लोकांची संख्या मोठी आहे," असे सिंघवी यांनी नमूद केले.

**बिहारींची बदनामी करू नका**

सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मतदार यादीत नाव असणे हा मतदाराचा घटनात्मक हक्क असल्याचा मुद्दा गोपाळ शंकरनारायणन यांनी 'एडीआर' संस्थेतर्फे मांडला. ''बिहारचे लोक शिकले सवरलेले असून प्रशासकीय सेवांमध्ये येथील लोकांचा दबदबा आहे त्यामुळे एसआयआर प्रकरणाच्या निमित्ताने त्यांची बदनामी करू नका,'' अशी टिप्पणी खंडपीठाने केली.

## पर्यायी बाजारपेठेचा शोध घेणार : मुख्यमंत्री

वाशी, ता. १२ (बातमीदार) : अमेरिकेने काही उद्योगांवर निर्बंध आणि टॅरिफ वाढविल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक उद्योगांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. यावर योग्य तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. ही समिती कोणकोणत्या क्षेत्रांना परिणाम होणार आहे, त्यांना कोणत्या प्रकारची मदत आवश्यक आहे आणि त्यांना पर्यायी बाजारपेठ कशी उपलब्ध करून देता येईल, याचा आढावा घेऊन उपाययोजना सुचवणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी नवी मुंबईतील ऐरोली येथे कॅपिटालँड डेटा सेंटरच्या उद्घाटनावेळी दिली.

फडणवीस म्हणाले, की अमेरिकेने लागू केलेल्या टॅरिफ वाढीमुळे काही उद्योगांच्या निर्यातीवर मर्यादा येऊ शकतात. यासाठी आम्ही बैठका घेतल्या असून, उद्योगांना आर्थिक मदत, निर्यात धोरणात बदल किंवा नवीन बाजारपेठेचा शोध यासारखे पर्याय विचारात घेतले जात आहेत. उच्चस्तरीय समिती लवकरच अहवाल सादर करेल आणि त्यानुसार उपाययोजना राबवल्या जातील. ऑनलाइन सेवा, ई-कॉमर्स, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासाठी डेटा सेंटरची गरज वाढली आहे. देशातील एकूण डेटा सेंटर्सपैकी ६० टक्के महाराष्ट्रात आहेत.

## इडली-वड्यात सापडली अळी

डोंबिवली, ता. १३ : कल्याण पश्चिम परिसरातील कर्णिक रोडवरील 'बंगलोर इडली कॅफे' या हॉटेलमधील इडली-वड्यात जिवंत अळी आढळल्याचा प्रकार उघडकीस आला. धक्कादायक बाब म्हणजे ग्राहकाने याबाबत तक्रार केल्यानंतर दुकानदाराने 'तुला बघून घेतो' अशी धमकी दिली. याप्रकरणी महापालिकेने तत्काळ कारवाई करीत दुकानातील सर्व खाद्यसाहित्य जप्त केले असून, महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात दुकानदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



वड्यात जिवंत अळी सापडली.

तक्रारदार प्रथमेश शिंदे मुलगा यांचा मंगळवारी (ता. १२) सायंकाळी 'बंगलोर इडली कॅफे' येथून एक वडा सांबर आणि एक इडली प्लेट पार्सल म्हणून घेऊन आला. घरी पोहोचल्यावर कुटुंबीय जेवताना वड्यात जिवंत अळी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी दुकानमालकाला घटनेची माहिती दिली; मात्र दुकानदाराने अरेरावी केली.

## आरोग्यहित महत्त्वाचे!

» पान १ वरून

मागविणारी सार्वजनिक सूचना काढावी आणि नंतर निर्णय घ्यावा,'' असे न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

**समितीची यादी सादर**

सार्वजनिक आरोग्याला धोका न पोहोचविता नियंत्रित पद्धतीने कबुतरांना खाणे देता येऊ शकते का, किंवा सार्वजनिक ठिकाणी कबुतरांना खाद्य दिल्यास मानवी आरोग्यावर काय परिणाम होईल, याचा वैज्ञानिक अभ्यास करणाऱ्या समितीच्या अकरा नावांची यादी राज्य सरकारच्यावतीने महाधिवक्ता वीरेंद्र सराफ यांनी सादर केली. या समितीत आपण सुचविलेल्या दोन तज्ज्ञांचा समावेश करण्याची सूचना न्यायालयाने केली. समिती स्थापनेबाबतची अधिसूचना २० ऑगस्टपर्यंत काढावी तसेच एका महिन्यात अहवाल सादर करावा, असे आदेशही न्यायालयाने समितीला दिले.

**उद्या आझाद मैदान मागाल**

महालक्ष्मी रेसकोर्स येथे कबुतरांना खाद्य टाकण्याबाबत विचार केला जाऊ शकतो. त्यामुळे कबुतरांचा त्रास कोणलाच होणार नाही, अशी मागणी एका याचिकाकर्त्यांकडून करण्यात आली होती. परंतु उद्या आझाद मैदान, शिवाजी पार्क मैदानाची मागणी कराल, अशा शब्दांत न्यायालयाने याचिकाकर्त्यांची कानउघाडणी केली.

## माजी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्यासह चौघांना अटक

» पान १ वरून

देण्यासह या प्रक्रियेत कोट्यवधींचा आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी ईडीने ही कारवाई केली. या आरक्षित भूखंडासह शेजारची खासगी जागा बनावट कागदपत्रे, नोंदी तयार करून विकसकांना मिळवून देण्यात गुप्ता पितापुत्रांचा सहभाग होता. या भूखंडांवर ४१ बहुमजली इमारती उभ्या राहिल्या. त्या उभारणाऱ्या विकसकांनाही यातील एक भूखंड शासकीय प्रकल्पांसाठी आरक्षित असल्याची जाणीव होती; मात्र इमारती उभ्या करून त्यातील सदनिका आणि व्यावसायिक गाळ्यांची विकसकांना विक्री केली. त्याविरोधात मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयात अनेक तक्रारी दाखल झाल्या होत्या. तसेच उच्च न्यायालयात याचिकाही दाखल झाल्या होत्या. न्यायालयाने या ४१ इमारती जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले. त्यामुळे सुमारे तीन हजार कुटुंबे बेघर झाली.


**उत्तर मध्य रेल्वे**

निविदा सूचना क्र.: JHS-N-GSU-06-25 — दिनांक : ०६-०८-२०२५

**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि वतीने डे.चीफ सिग्नल अँड टेलिकॉम इंजिनिअर/जीएसयू/झाशी, डीआरएम कार्यालय, झाशी हे खालील कामासाठी ऑनलाईनद्वारे (ई-निविदा) खुली निविदा मागवित आहेत.

| | |
|---|---|
| **कामाचे वर्णन :** झाशी विभागाच्या चिरगाव स्थानक येथे संपूर्ण लांबीच्या गुडस लाईनच्या ब्लास्ट साईडिंगचे रूपांतरण आणि पूर्ण लांबीच्या शुंटिंग नेकसाठी A & D साईडिंगचा विस्तार आणि रायरू गुडस शेड येथे दोन अतिरिक्त लोडिंग अनलोडिंगच्या तरतुदीसह संबंधितमध्ये इतर S&T कामे आणि EI अल्टरेशन. | |
| **अंदाजे किंमत :** रु. १९३१०९१९.३८ | **बयाणा रक्कम :** रु. २४६६००.०० |
| **निविदा अर्जाची किंमत :** निरंक | **निविदा उघडणे :** २९-०८-२०२५ वेळ : १५.०० |
| **स्वीकृती पत्र जारी केल्यापासूनचा कार्यपूर्ती अवधी :** १२ महिने | |

• निविदा **२९-०८-२०२५ रोजी १५.००** वाजेपर्यंत सादर कराव्यात. • संपूर्ण तपशील आणि बोली सादरीकरणासाठी कृपया भारतीय रेल्वेचे संकेतस्थळ **www.ireps.gvo.in** पाहावे.

**(झाशी विभाग -गति शक्ती, उत्तर मध्य रेल्वे)** 1446/25 (AS)

North central railways www.ncr.indianrailways.gov.in @CPRONCR



KANSAI PAINT NEROLAC

**कन्साई नेरोलॅक पेंट्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय :** २८ वा मजला, ए-विंग, मॅराथॉन फ्युचरेक्स एन.एम.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३, महाराष्ट्र.
दूरध्वनी: +९१ २२ ४०६०२५००/४०६०२५०१, **संकेतस्थळ :** www.nerolac.com
**गुंतवणूकदार रिलेशन्स ई-मेल आयडी :** investor@nerolac.com
**CIN:** L24202MH1920PLC000825

**कन्साई नेरोलॅक पेंट्स लिमिटेडच्या प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विनंतीच्या री-लॉजमेंटसाठी विशेष खिडकी**

सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 दिनांक २ जुलै २०२५ नुसार, सर्व भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कागदपत्रांतील त्रुटी/प्रक्रिया/ किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे नाकारण्यात आलेले / परत पाठविलेले / उपस्थित नसलेल्या आणि १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केलेल्या प्रत्यक्ष भागांच्या हस्तांतरण विनंतीच्या री-लॉजमेंट सुविधेसाठी ७ जुलै २०२५ पासून ते ६ जानेवारी २०२६ पर्यंत सहा महिन्यांच्या कालावधीसाठी विशेष खिडकी उघडण्यात येणार आहे.

या कालावधीदरम्यान, सिक्युरिटिज ज्या हस्तांतरणासाठी पुन्हा दाखल करण्यात आलेल्या आहेत (अशा विनंतीचा समावेश ज्या कंपनी/त्यांचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी (RTA), दिनांका रोजी प्रलंबित आहेत ) फक्त डीमॅट स्वरूपात जारी करण्यात येतील. अशा हस्तांतरणसह डिमॅट विनंतीसाठी आवश्यक प्रक्रियेचे पालन करावे.

गुंतवणुकदार ज्यांनी त्यांची अलीकडील मुदत ३१ मार्च २०२१ चुकविली आहे त्यांना कंपनीचे RTA म्हणजेच MUGF इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लि.), सी-१०१, एम्बॅसी २४७, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३ यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे सादर करून ही संधी प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

**कन्साई नेरोलॅक पेंट्स लिमिटेडकरिता**
**सही/-**
**ठिकाण :** मुंबई — **जी. टी. गोविंदराजन**
**दिनांक :** १३ ऑगस्ट २०२५ — **कंपनी सचिव**



वाढवण बंदर VADHVAN PORT — PORT OF VIKSIT BHARAT

**वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड**
(प्रोजेक्ट कार्यान्वयन प्रभाग)

जनेप प्राधिकरण JNPA

निविदा सूचना क्रमांक: व्हीपीपीएल/पीआईडी/एचएएम/२०२५-२६/टी-०९ — दिनांक: १४.०८.२०२५

**प्रस्तावाच्या विनंतीची जागतिक स्तरावर मागणी (एकच टप्पा - दोन कव्हर)**

भारत सरकारने वाढवण बंदर विकासासाठी वाढवण बंदर प्रकल्प लिमिटेड (व्हीपीपीएल) ला (जेएनपीए आणि एमएमबी ची एसपीव्ही) सोपवला आहे. राष्ट्रीय सुरक्षा मंजुरीच्या अधीन राहून बोलीदार (सवलतधारक) पात्र होण्यासाठी आणि निवडण्यासाठी खाली दिलेल्या कामासाठी इच्छुक पक्षांकडून (बोलीदारांकडून) जागतिक पातळीवर बोली मागविण्यात येत आहेत. प्रकल्पाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे आहे:

| प्रकल्पाचे नाव | अंदाजे प्रकल्प खर्च (जीएसटी वगळून) (रु. कोटीमध्ये) |
|---|---|
| वाढवण किनारपट्टीच्या किनाऱ्यावर हायब्रिड ॲन्युइटी मोडवर, पीपीपीवर वाढवण बंदरासाठी ऑफशोअर प्रोटेक्शन बंधारा, ड्रेजिंग, रिक्लेमेशन आणि बांधकाम करून जमिनीचा विकास आणि देखभाल. (१२०७ हेक्टर पुनर्प्राप्ती क्षेत्र) | १९,२३८.५७ (टप्पा-१: १४,३०१.३५ आणि टप्पा-२: ४,९३७.२३) |

संपूर्ण बोली दस्तऐवज व्हीपीपीएल वेबसाइट **https://vadhvanport.in** किंवा ई-प्रोक्योरमेंट पोर्टल (सीपीपी पोर्टल) **https://etenders.gov.in/eprocure/app** वरून **२२ ऑगस्ट २०२५ ते ४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत** भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत पाहता / डाउनलोड करता येईल. तांत्रिक आणि आर्थिक बोली केवळ **७ ऑक्टोबर २०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी भारतीय प्रमाण वेळेनुसार ऑनलाइन सादर कराव्यात. तांत्रिक बोली **८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३:३०** वाजेनंतर उघडल्या जातील. इतर कोणत्याही पद्धतीने सादर केलेली बोली स्वीकारली जाणार नाही. तथापि, बोली दस्तऐवजाची किंमत, बोली सुरक्षा, बोलीवर स्वाक्षरी करण्यासाठी पॉवर ऑफ ॲटर्नी, कन्सोर्टियमच्या प्रमुख सदस्यासाठी पॉवर ऑफ ॲटर्नी, लागू असल्यास कन्सोर्टियमसाठी संयुक्त बोली करार आणि अखंडता करार हे आरएफपी दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष सादर केले जातील. अर्जपूर्व / बोलीपूर्व परिषद ११ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता जेएनपीएच्या मुंबई कार्यालय १५०२, एक्सप्रेस टॉवर, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१ येथे आयोजित केली जाईल.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (व्हीपीपीएल)**



Castrol

**कॅस्ट्रोल इंडिया लिमिटेड**

**सीआयएन : L23200MH1979PLC021359**
**नोंदणीकृत कार्यालय :** टेक्नोपोलीस नॉलेज पार्क, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३
**वेबसाइट :** www.castrol.co.in **ई-मेल :** investorrelations.india@castrol.com
**दूरध्वनी क्रमांक :** + ९१ २२ ७१७७ ७१११ **फॅक्स :** + ९१ २२ ६६९८ ४१०१

**टपाली मतदानाची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') चे अनुच्छेद ११० च्या तरतुदी व अन्य लागू तरतुदी, काही असल्यास तसेच त्याअंतर्गत संस्थापित नियम सहवाचन कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे ('एमसीए') जारी सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२०, दि. ०८.०४.२०२०, क्र. १७/२०२०, दि. १३.०४.२०२०, क्र. ०९/२०२४, दि. १९.०९.२०२४ व अन्य संबंधित परिपत्रके (एकत्रितरीत्या 'एमसीए परिपत्रके' म्हणून उल्लेखित) (यामध्ये वेळोवेळी लागू कोणत्याही वैधानिक सुधारणा वा पुनराधिनियम यांचा समावेश), सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४४ ('सेबी सूची विनियमन') तसेच अन्य लागू कायदे, यांच्या अनुपालनांतर्गत दूरस्थ ई-मतदान ('ई-मतदान') प्रक्रियेच्या माध्यमातून टपाली मतदानाद्वारे खालील ठरावांवर कॅस्ट्रोल इंडिया लिमिटेडच्या भागधारकांची मंजुरी प्राप्त करण्यात यावयाची आहे.

| अ. क्र. | तपशील | ठरावाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | कंपनीचे संचालक म्हणून मृणालिनी श्रीनिवासन (डीआयएन : ०९६८२२३४) यांची नेमणूक करणे. | सामान्य |
| २. | दि. २८.०७.२०२५ ते दि. २७.०७.२०३० पर्यंत लागोपाठ पाच वर्षे कालावधीकरिता कंपनीचे पूर्णवेळ संचालक म्हणून मृणालिनी श्रीनिवासन (डीआयएन : ०९६८२२३४) यांची नेमणूक करणे. | सामान्य |
| ३. | लागोपाठ पाच वर्षे कालावधीकरिता कंपनीचे सेक्रेटरियल ऑडिटर म्हणून मे. पारीख ॲन्ड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरीज यांची नेमणूक करणे. | सामान्य |

ए) एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत, **शुक्रवार, दि. ०८.०८.२०२५ ('निर्धारित अंतिम तारीख')** रोजीनुसार ज्या भागधारकांची नावे सभासदांचे रजिस्टर/लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद असतील तसेच ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीज् यांच्याकडे नोंदणीकृत असतील अशा भागधारकांना स्पष्टिकरण अहवालासमवेत टपाली मतदानाची सूचना ('टपाली मतदान सूचना') **बुधवार, दि. १३.०८.२०२५** रोजी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवण्यात आली आहे.

बी) टपाली मतदान सूचना कंपनीची वेबसाइट https://www.castrol.com/en_in/india/home/investors/general-meeting.html, वर, स्टॉक एक्सचेंजेस अर्थात बीएसई लिमिटेड वेबसाइट www.bseindia.com वर व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर व सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) वेबसाइट www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.

सी) एमसीए परिपत्रकांच्या तरतुदींच्या अनुपालनांतर्गत भागधारक ई-मतदान प्रक्रियेच्या माध्यमातून केवळ मत देऊ शकतील. त्यानुसार, कंपनीने इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मत देता येण्याकरिता भागधारकांसाठी ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता सीडीएसएलची सेवा नेमली आहे. पुढे, भागधारकांना टपाली मतदान फॉर्म व प्री-पेड बिझनेस एन्व्हलप यांसमवेत टपाली मतदान सूचनेची कागदोपत्री प्रत पाठवण्यात येत नाही.

डी) ई-मतदान कालावधी खालीलप्रमाणे आहे :

| | |
|---|---|
| ई-मतदान प्रारंभ | गुरुवार, दि. १४.०८.२०२५ रोजी स. ९.०० पासून (भा. प्र. वे.) |
| ई-मतदान समाप्ती | शुक्रवार, दि. १२.०९.२०२५ रोजी सायं. ५.०० पर्यंत (भा. प्र. वे.) |

ई) भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी की, शुक्रवार, दि. १२.०९.२०२५ रोजी सायं. ५.०० पर्यंत (भा. प्र. वे.) पश्चात ई-मतदानास परवानगी नसेल व तत्पश्चात सीडीएसएलद्वारे सदर सुविधा अकार्यरत करण्यात येईल. भागधारकाद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर पुढे त्याला ते बदलण्याची परवानगी नसेल.

एफ) निर्धारित अंतिम तारखेनुसार एखाद्या व्यक्तीचे नाव सभासदांचे रजिस्टर/बेनिफिशियल ओनर्सच्या रजिस्टरमध्ये नोंद असल्यास सदर व्यक्ती केवळ ई-मतदान सुविधा प्राप्त करण्यास व इलेक्ट्रॉनिक स्वरूपात मत देण्यास पात्र असेल. निर्धारित अंतिम तारखेनुसार भागधारकाच्या नावे नोंदणीकृत असलेल्या समभागांच्या प्रदानित मूल्यावर मतदान हक्क गणला जाईल. निर्धारित अंतिम तारखेस भागधारक नसलेल्या व्यक्तींनी टपाली मतदान सूचना केवळ माहितीसाठी समजावी.

जी) डीमटेरियलाइज्ड् स्वरूपात भागधारक असलेल्या भागधारकांनी कृपया त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सच्या माध्यमातून त्यांचे ई-मेल आयडी व मोबाइल क्रमांक त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीज्कडे नोंदणीकृत करावेत. कागदोपत्री स्वरूपात भागधारक असलेले सभासद आरटीए यांना einward.ris@kfintech.com येथे ई-मेल पाठवून आरटीएकडे आपला ई-मेल आयडी नोंदणीकृत करू शकतील. कृपया नोंद घ्यावी की, इलेक्ट्रॉनिक मतदानादरम्यान ई-मेल पत्ता व मोबाइल क्रमांकाचे नोंदणीकरण अनिवार्य आहे.

एच) कागदोपत्री स्वरूपात भागधारक असलेल्यांनी कृपया यासंदर्भात जारी संबंधित सेबी परिपत्रकांच्या अंतर्गत त्यांचे नामांकन व केवायसी तपशील अद्ययावत करावेत. सदर तपशील अद्ययावय करण्याची प्रक्रिया व प्रारूप कंपनीची वेबसाइट https://www.castrol.com/en_in/india/home/investors/information-for-shareholders.html येथे उपलब्ध असेल. डीमॅट स्वरूपात भागधारक असलेल्या सभासदांनी कपया त्यांचे नामांकन व केवायसी तपशील संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे अद्ययावत करावेत.

आय) कागदोपत्री स्वरूपात भागधारक असलेल्या भागधारकांकरिता मत देण्याच्या स्वरूपासमवेत ई-मतदानाकरिताच्या प्रक्रियेचे निर्देश टपाली मतदान सूचनेचा भाग म्हणून उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

जे) ई-मतदानाकरिता मत स्वीकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत भागधारकांद्वारे त्यांचे नाव, फोलिओ क्र./डीपी आयडी व क्लायन्ट आयडी नमूद करून investorrelations.india@castrol.com येथे प्राप्त विनंतीच्या आधारावर भागधारकांना टपाली मतदान सूचनेत निर्देशित संबंधित दस्तावेज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात परीक्षणाकरिता उपलब्ध असतील.

के) ई-मतदानाच्या माध्यमातून टपाली मतदान नि:पक्ष व पारदर्शक पद्धतीने आयोजित करण्याकरिता परीनिरीक्षक म्हणून संचालक मंडळाने त्यांच्या दि. ०५.०८.२०२५ रोजी आयोजित सभेमध्ये श्री. के. जी. सराफ - मे. सराफ ॲन्ड असोसिएट्सचे प्रोप्रायटर, कंपनी सचिव (सी. पी. नं. ६४२) यांची नेमणूक केली आहे.

एल) परीनिरीक्षणाच्या समाप्तीपश्चात परीनिरीक्षक आपला अहवाल अध्यक्षांकडे किंवा अन्य कोणत्याही महत्त्वपूर्ण व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांकडे सोपवतील आणि अध्यक्ष वा अन्य कोणत्याही महत्त्वपूर्ण व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांद्वारे ई-मतदान प्रक्रियेच्या माध्यमातून टपाली मतदानाद्वारे मतदानाचा निकाल मंगळवार, दि. १६.०९.२०२५ रोजी वा तत्पूर्वी घोषित करण्यात येईल व स्टॉक एक्सचेंजेस, डिपॉझिटरीज आणि रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट यांना कळविण्याबरोबरच तो कंपनीची वेबसाइट (https://www.castrol.com/en_in/india/home/investors/general-meeting.html) वर प्रदर्शित करण्यात येईल.

एम) ई-मतदानाशी संबंधित विस्तृत निर्देशांकरिता भागधारकांनी कृपया टपाली मतदान सूचनेत निर्देशित टीपा अनुभाग वाचावा. सीडीएसएलच्या ई-मतदान सुविधेसंदर्भात काही शंका वा तक्रारी असल्यास सभासदांनी www.evotingindia.com च्या help section वर उपलब्ध Frequently Asked Questions (FAQs) व e-voting manual वाचावे किंवा श्री.राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सीडीएसएल, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, मफतलाल मिल कम्पाऊंड, ना. म. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०१३ येथे संपर्क साधावा किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई-मेल लिहावा किंवा टोल फ्री क्र. १८०० २१ ०९९११ वर संपर्क साधावा.

**कॅस्ट्रोल इंडिया लिमिटेड करिता**
**ठिकाण : मुंबई** — **हेमांगी घाग**
**दिनांक : १४.०८.२०२५** — **कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**



**मध्य रेल्वे**

**शुद्धिपत्रक क्र. १**

**निविदा क्र. CR-BB-SNT-P-TELE-2025-39** निविदा क्र. CR-BB-SNT-P-TELE-2025-39 साठी शुद्धिपत्रक १ जारी करण्यात आलेले आहे. **निविदा बंद होण्याचा सुधारीत दिनांक आणि वेळ १२-०९-२०२५ रोजी १५.०० वा. आहे.** तपशील संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर पाहाता येतील. इतर सर्व अटी आणि शर्तीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. **ही निविदा पब्लिक प्रोक्युअरमेंट पॉलिसी ऑर्डर २०१७/ दिनांक १५-०६-२०१७ चे अनुपालन करते.**

366 — **DRM (S&T) CSMT**

अनधिकृतपणे रेल्वे लाईन ओलांडणे दंडनीय अपराध आहे.



**परिवहन सेवा, ठाणे महानगरपालिका**

ई-निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका, परिवहन सेवेस संगणक व संगणकिय साहित्य मुळ उत्पादक, अधिकृत वितरक आणि पुरवठादार यांचेकडुन Above/Below/At Par या तत्वावर खरेदीकरीता दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविणेत येत आहे. ई-निविदा सूचना व निविदा प्रपत्रे दि.१४/०८/२०२५ पासून दि.२१/०८/२०२५ रोजी १५.०० वा. पर्यंत अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर उपलब्ध आहेत. ई-निविदा दि.२१/ ०८/२०२५ रोजी १५.०० वा.पर्यंत स्विकारणेत येतील, व शक्य झाल्यास स्विकारलेल्या निविदा ऑनलाईन पध्दतीने दि.२२/०८/२०२५ रोजी १६.०० वा. उघडण्यांत येतील.

ठामपा/पिआरओ/परिवहन/ ५२३/२०२५-२६ — सही/-
दि.१३.०८.२०२५ — परिवहन व्यवस्थापक
Pls visit our oficial web-site — परिवहन सेवा,ठा.मपा.ठाणे
www.thanecity.gov.in



**दि ग्रेट इस्टर्न शिपिंग कं. लि.**

**नोंदणीकृत कार्यालय :** ओशन हाऊस, १३४-ए, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
**CIN :** L35110MH1948PLC006472
**दूरध्वनी क्र.** +९१ (२२) ६६६१३०००; **फॅक्स क्र.** +९१ (२२) २४९२५९००

**१०० दिवसांचे अभियान -'सक्षम निवेशक' - IEPF कडे देण्यात न आलेला/दावा न केलेल्या लाभांशाच्या हस्तांतरण प्रतिबंधासाठी भागधारकाची नियुक्ती आणि इतर संबंधित अद्ययावतीकरण आणि केवायसीसाठी.**

प्रिय भागधारक

मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (MCA) परिपत्रक दिनांक १६ जुलै २०२५ नुसार, दि ग्रेट इस्टर्न शिपिंग कंपनी लिमिटेड (दि कंपनी) यांनी २८ जुलै २०२५ पासून ते ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत १०० दिवसांचे 'सक्षम निवेशक' अभियान चालू केले आहे. या अभियानादरम्यान, सर्व भागधारक ज्यांनी २०१८-१९ पासून ते २०२३-२४ पर्यंत कोणत्याही आर्थिक वर्षासाठी त्यांच्या लाभांशाचा दावा केलेला नाही किंवा त्यांचे केवायसी अद्ययावत केलेले नाहीत किंवा दावा न केलेल्या लाभांशाच्या आणि भागांच्याबाबतीत कोणत्याही समस्या असल्यास, कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी (RTA) म्हणजेच कफिन टेक्नॉलॉजिज लिमिटेड (युनिट : दि ग्रेट इस्टर्न शिपिंग कं. लि.) सेलेनियम टॉवर-बी, प्लॉट नं. ३१-३२, फायनॅन्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, सेरिलिंगमपल्ली, गाचिबोवली हैदराबाद, तेलंगणा-५०० ०३२, ई-मेल आयडी - einward.ris@kfintech.com येथे लिहावे.

भागधारकांनी नोंद घ्यावी की, हे अभियान भागाधारकांचे केवायसी अद्ययावतीकरण, बँक तपशील, नामनिर्देशन आणि संपर्क माहितीसाठी कंपनीच्या भागधारकांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेषतः सुरु केले आहे. गुंतवणुकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणाच्या (IEPFA) हस्तांतरणापासून त्यांच्या भागांच्या प्रतिबंधासाठी वर नमूद आर्थिक वर्षासाठी त्यांच्या लाभांशाचा दावासुद्धा भागधारक करू शकतील.

धन्यवाद,

आपले विश्वासू
**ग्रेट इस्टर्न शिपिंग कं. लि.**
**सही/-**
**ठिकाण : मुंबई** — **आनंद पुंडे**
**दिनांक : १३ ऑगस्ट २०२५** — **कंपनी सचिव**



# वास्तुशास्त्र नियोजन

**ऑनलाईन कार्यशाळा**

नवीन घर बांधायचं, नवीन जागा घ्यायचं, आपण ज्या घरात राहत आहोत त्यामध्ये कळत नकळत आपल्याकडून दोष निर्माण झालेले असतात ज्याचा परिणाम घरातील व्यक्तींवर होत असतो, तर आपले घर वास्तु दोष मुक्त असावे ही इच्छा बाळगणाऱ्या सर्वांसाठी !!

**कोण सहभागी होऊ शकते:**

- वास्तु सल्लागार म्हणून काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येकासाठी
- आर्किटेक्ट्स, इंटेरिअर डिझायनर, सिव्हिल इंजिनिअर्स व या क्षेत्रातील विद्यार्थी
- नवीन वास्तु खरेदी किंवा बांधकाम करणाऱ्या सर्वांसाठी

**महत्त्वाचे शिकवले जाणारे मुद्दे:**

- वास्तुशास्त्र काय आहे, वास्तुदोष कोणते आहेत, त्याचे परिणाम कोणाला जाणवतात
- दिशा, उपदिशा, अधिपती देवता आणि पंचतत्त्व, दिशा आणि प्रभाव, वास्तुपुरुष मंडळ, मर्मस्थान, उपमर्मस्थान, वास्तुशास्त्र मध्ये काय काय आहे
- जमीन कशी निवडावी, घर नक्की कोठे व कसे बांधले पाहिजे
- घर बांधताना प्रारंभ कसा करावा, घरातील अंतर्गत रचना कशी असावी
- मुख्य दरवाजाची दिशा ओळखणे, दरवाजा कोठे करावा, चौकट रत्नाध्याय, वास्तुचे आयुष्य, घराचे कट व त्याचे घरावर होणारे परिणाम
- वास्तु आणि व्यवसाय संधी इ.

कालावधी : ६ दिवस
शुल्क : ₹ ३०००/- + जीएसटी
**प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर SIILC चे प्रमाणपत्र मिळेल.**

व्हॉट्सअप ग्रुप जॉईन करण्यासाठी QR code स्कॅन करा.

अधिक माहितीसाठी संपर्क करा
+९१ ९३ ५६९ ७३ ४२७
( व्हॉट्सअपवर देखील नावनोंदणी स्वीकारली जाईल )

अधिक माहितीसाठी QR Code स्कॅन करा

SIILC Transforming Human Capital

SIMACES | company/simaces-learning-llp | simaces_siilc | simaces learning llp